आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१४ ऑक्टोबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- दमणगंगा-एकदरे-गोदावरी आणि दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदी जोड योजनेला तसंच आष्टी उपसा सिंचन योजनेला राज्यसरकारची सुधारित मान्यता
- मुंबईच्या पाचही प्रवेशद्वारांवर गर्दी टाळण्यासाठी लहान वाहनांना टोल माफ करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
- यंदाच्या राष्ट्रीय जलपुरस्कारांमधे महाराष्ट्राला विविध विभागात मिळून ५ पुरस्कार

**आणि**

- यंदाचा अर्थशास्त्रासाठीचा नोबेल पुरस्कार डेरॉन असेमोग्लु, सायमन जॉन्सन आणि जेम्स रॅबिन्सन या अमेरिकन शास्त्रज्ञांना जाहीर

**<><><><><>**

राज्य सरकारनं आज दमणगंगा एकदरे गोदावरी आणि दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदी जोड योजनेला तसंच आष्टी उपसा सिंचन योजनेला सुधारित मान्यता दिली. दमणगंगा एकदरे गोदावरी नदी जोड योजनेचा लाभ मराठवाड्यातल्या १० हजार हेक्टरहून अधिक क्षेत्राला होईल. दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदी जोड योजनेचा लाभ सिन्नर तालुका आणि जायकवाडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्राला होईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला.

मुंबईतल्या ५ प्रवेश मार्गांवरचा हलक्या वाहनांसाठीचा टोल माफ करायचा निर्णयही राज्य सरकारनं घेतला. शाळेच्या बस आणि एसटीच्या बसलाही याचा फायदा होईल. मुंबईतल्या प्रवेशद्वारांवर होणारी गर्दी कमी करण्यासाठी हा निर्णय

घेतला आहे. हा निर्णय निवडणुकीपुरता नसून कायमस्वरुपी राहणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत आज १९ निर्णय झाले.

बांधकाम कामगार मंडळाच्या कामगारांना प्रत्येकी ५ हजार रुपयांची मदत देण्याचा, दि. बा. पाटील यांच्या नावे आगरी समाजासाठी महामंडळ स्थापन करण्याचा, राज्यात प्रधानमंत्री शहरी आवास योजनेचा दुसरा टप्पा राबवण्याचा निर्णय आज घेण्यात आला. मराठी भाषेविषयी जनजागृतीसाठी पंधरवडा साजरा करण्याचा, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाला पद्मविभूषण रतन टाटा यांचं नाव देण्याचा, अडचणीतल्या सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ करण्याचा निर्णय आज मंत्रीमंडळाने घेतला. अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास मंडळ आणि उमेदसाठी अभ्यासगट स्थापन करायलाही राज्य सरकारनं मान्यता दिली. पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातल्या मार्गिकेच्या कामांनाही आज राज्य मंत्रीमंडळाची मंजुरी मिळाली.

<><><><><>

राज्य सरकारनं तलाठी पदाचं नाव बदलून ग्राम महसूल अधिकारी केलं आहे. कोतवाल पदाचं नाव बदलून महसूल सेवक करण्याचा शासन आदेशही सरकारनं आज जारी केला. या नाव बदलामुळं तलाठी किंवा कोतवालांचं काम किंवा वेतनश्रेणीत काहीही बदल होणार नाही. तलाठी आणि कोतवालांच्या संघटनेनं केलेल्या मागणीनुसार सरकारनं ही नावं बदलली आहेत.

<><><><><>

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यातल्या विजेत्या शाळांना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या  हस्ते आज पुरस्कार देऊन

गौरवण्यात आलं. शालेय शिक्षणंत्री दीपक केसरकर यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

शासकीय शाळा गटात पुणे विभागातल्या धानोरे इथल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला पहिला, ठाणे जिल्ह्यातल्या एनएमएमसी शाळा क्रमांक ५५, आंबेडकर नगर या शाळेला दुसरा, तर गडचिरोलीतल्या जवाहरलाल नेहरू एन. पी. प्राथमिक शाळेला तिसऱ्या क्रमांकाचं पारितोषिक देऊन गौरवण्यात आलं. याशिवाय इतरही शाळांचे मुख्याध्यापक आणि पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

**<><><><><>**

येत्या काळात प्रत्येक गिरणी कामगाराला घर देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. सध्या या घरांसाठी अर्ज केलेल्या १ लाख ६५ हजारांपैकी १ लाख १८ हजार अर्ज वैध ठरले आहेत. त्यांना लवकरच घरं दिली जातील, अशी माहिती गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी आज दिली. गिरणी कामगारांसाठीच्या घरांचं बांधकाम करणाऱ्या विकासकांना पत्र वाटपाच्या कार्यक्रमात मुंबईत ते बोलत होते. या १५ लाखाच्या घरामधले साडे ५ लाख रुपये सरकार भरणार असून उरलेले साडे ९ लाख रुपये गिरणी कामगार किंवा त्यांच्या वारसांना भरावे लागतील. यात ३०० चौरस फुटाचं घर आणि इतर सोयी सुविधा असतील.

**<><><><><>**

दिवाळीत गर्दीच्या हंगामामुळं होणारी भाडेवाढ मागे घेण्याचा निर्णय एसटी महामंडळानं घेतला आहे. २५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर दरम्यान ही भाडेवाढ होणार होती. यासंदर्भातलं पत्रक शुक्रवारी महामंडळानं प्रसिद्ध केलं होतं. हे पत्रक मागे घेत असल्याचं एसटी महामंडळानं आज जाहीर केलं.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचा खटला जलदगती न्यायालयात चालवू, या प्रकरणातल्या सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी करू असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत सांगितलं.

सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणातील तिसरा आरोपी प्रवीण लोणकर याला मुंबई पोलिसांनी पुण्यातून अटक केली. न्यायालयानं त्याला २१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.  प्रवीणचा भाऊ शुभम फरार आहे.

<><><><>

पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांमधल्या उत्कृष्ट महानगरपालिका श्रेणीत पुणे महानगर पालिकेला तिसरा क्रमांक जाहीर झाला आहे. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी नवी दिल्लीत या पुरस्कारांची घोषणा केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू २२ ऑक्टोबरला नवी दिल्लीत या पुरस्कारांचं वितरण करतील. उत्कृष्ट राज्यांच्या श्रेणीत ओडिशा प्रथम, उत्तर प्रदेश द्वितीय तर गुजरात आणि  पुद्दुचेरीला संयुक्तरित्या तिसरा पुरस्कार मिळाला आहे.

सिव्हील सोसायटी श्रेणीत पुण्यातल्या बायफ विकास संशोधन फाऊंडेशनला पहिला आणि नाशिकच्या युवा मित्रला दुसरा पुरस्कार जाहीर झाला आहे. पाणी वापर संघटनेच्या श्रेणीत बुलडाणा जिल्ह्यातल्या पेंटाकली प्रकल्प संघटनेला पहिला पुरस्कार तर उद्योग श्रेणीत यवतमाळच्या रेमंड युको डेनिम कंपनीला तिसरा पुरस्कार जाहीर झाला आहे.

<><><><>

यंदाचा अर्थशास्त्रासाठीचा नोबेल पुरस्कार डेरॉन असेमोग्लु, सायमन जॉन्सन आणि जेम्स रॉबिन्सन या अमेरिकन शास्त्रज्ञांना जाहीर झाला आहे. आर्थिक विकासात, आर्थिक असमानता कमी करण्यात, आणि कायदा सुव्यवस्था सुधारण्यात  समाजरचनेतल्या  संस्थांची भूमिका यावर त्यांनी संशोधन केलं आहे.

स्वेरिज रिक्सबँक नावाने यापूर्वी ओळखला जाणारा हा पुरस्कार ११ लाख अमेरिकन डॉलर्सचा आहे.

**<><><><>**

पॅरिस ऑलिम्पिक आणि पॅरा ऑलिम्पिक स्पर्धा तसंच बुडापेस्ट इथं झालेल्या बुद्धीबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत गौरवास्पद कामगिरी करणाऱ्या राज्यातील खेळाडूंचा आणि त्यांच्या प्रशिक्षकांचा आज सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या कार्यक्रमात सन्मान करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते त्यांना धनादेश आणि स्मृतीचिन्ह देण्यात आलं.

**<><><><>**

अनेक गंभीर गुन्ह्यांत सहभागी असलेल्या नक्षल दाम्पत्यानं आज केंद्रीय राखीव दल आणि गडचिरोली जिल्हा पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. वरुण राजा मुचाकी उर्फ उंगा उर्फ मनिराम उर्फ रेंगू याच्यावर १५ गुन्हे दाखल असून सरकारनं त्याच्यासाठी ८ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. तो छत्तीसगडचा असून तो सध्या भामरागड दलमचा कमांडर म्हणून कार्यरत होता. त्याची पत्नी रोशनी विजया वाच्छामी हिच्यावरही २३ गुन्हे दाखल असून सरकारनं तिच्यावर २ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होतं.

**<><><><>**

महिलांच्या टी २० विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंड आणि पाकिस्तान यांच्यातला सामना थोड्या वेळात सुरु होईल. न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे.

**<><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज दिल्लीत काँग्रेसची बैठक झाली. राज्यातल्या विधानसभा निवडणुकीबद्दल या बैठकीत चर्चा झाली असून महाविकास आघाडी म्हणूनच निवडणूक लढवणार असल्याचं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बैठकीनंतर सांगितलं.

<><><><>

नांदेडमध्ये आज स्वराज्य पक्षातर्फे शेतकरी आसूड मोर्चा काढण्यात आला. सोयाबीनला प्रति क्विंटल ८ हजार ५०० रुपये दर मिळावा, कापसाला ११ हजार प्रति क्विंटल, ऊसाला प्रति टन ३ हजार ५०० रुपये दर मिळावा, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई त्वरित द्यावी अशा विविध मागण्या करण्यात आल्या.

<><><><>

महाविकास आघाडीच्या वतीनं आज सिंधुदुर्ग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासमोर आंदोलन करण्यात आलं. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ७० टक्क्यांहून अधिक पदं रिक्त असून नवीन इमारतीच्या कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. याबाबत शासनाचं लक्ष वेधण्यासाठी तसंच अधिष्ठाता यांच्या कार्यपद्धतीचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीनं आंदोलन करण्यात आलं.

<><><><>

गेल्या २४ तासांत विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार, कोकणात बऱ्याचं ठिकाणी तर मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडला.

पुढचे दोन दिवस कोकणात बऱ्याच ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.